पुढारी

## संक्षिप्त




रत्नागिरी : सिव्हिलसाठी ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर देताना.

# मुकुल माधव फाऊंडेशनतर्फे सिव्हिलला १० ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर

रत्नागिरी : फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाऊंडेशनने एक पाऊल पुढे टाकत सिव्हिल हॉस्पिटल रत्नागिरीला १० ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर देणगी स्वरूपात देण्यात आले. सध्या देशभरात ऑक्सिजन वायूची कमतरता आणि कोव्हिड १९ रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर देणगी देऊन सिव्हिल हॉस्पिटलला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आणि जिल्हा शल्य चिकित्सक, रत्नागिरी यांच्याकडून करण्यात आले आहे. याचाच एक भाग म्हणून १४ मे रोजी फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाऊंडेशनने जिल्हाधिकारी लक्ष्मीनारायण मिश्रा व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संघमित्रा फुले यांच्याकडे १० ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर सुपूर्द केले. याचा सरकारी रुग्णालयांना चांगला फायदा होणार आहे. या पूर्वी फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाऊंडेशनने जिल्हा प्रशासनाला कोविड काळात १६ सुसज्ज आयसीयू बेड, सलाईन स्टँड, मल्टीपारा मॉनिटर, व्हेंटिलेटर, पीपीई किट्स आणि HFNO मशिन दिले आहेत. जिल्हाधिकारी लक्ष्मीनारायण मिश्रा व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संघमित्रा फुले यांनी कोव्हिड १९ या परिस्थितीत निरंतर सहकार्य केल्याबद्दल मुकुल माधव फाऊंडेशनच्या विश्वस्थ सौ. रितू प्रकाश छाब्रिया यांचे आभार मानले.